# मराठ्यांना फसविले! धनगरांना फसविले! दलितांना फसविले आता ओबीसींना भुलवणार! शेतकऱ्यांना आत्महत्या करायला शेततळी बांधतच आहेत!

ध्येय महत्त्वाचं की ध्येयाकडे नेणारा मार्ग महत्त्वाचा हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. याचे कारण या प्रश्नाच्या उत्तरानुसार ध्येयाचे रूपच बदलून जाते. सत्तेतून समाजाचे भले करायचे हे ध्येय असेल, पण या ध्येयापर्यंत पोचण्यासाठी वाटेल तो मार्ग अवलंबविण्याचा निर्णय घेतला तर काय होते? जो मार्ग मिळेल, त्यावर पुढे जाऊन सत्ता मिळते. पण ही सत्ता कधीही समाजासाठी निष्ठेने उपयोगात आणता येत नाही. कारण मार्ग चुकल्याने सत्तेचा मूळ उद्देशच हरवून जातो. भ्रष्ट लोकांना पक्षात घेऊन सत्ता मिळवली तर सत्ता आल्यावर हे भ्रष्ट लोक आपला हिस्सा मागतात. त्यामुळे अशी सत्ता पारदर्शकपणे राबविताच येत नाही. गुंडांना घेऊन सत्ता मिळवली तर गुंडगिरी होणारच आहे. सत्तेत, प्रेमात आणि युद्धात वाटेल ते माफ आहे हे जे प्रचलित वाक्य आहे तेच फसवे आहे. मार्ग योग्य नसेल तर गाठलेले ध्येय हा फक्त वरकरणी विजय असतो. कारण ध्येय गाठल्यानंतर जे सत्कर्म करायचे असते ते गैरमार्गाने चालल्यावर कधीही करता येत नाही. आपण ध्येय गाठले असे म्हणतो, त्या ध्येयाचे रूपच गैरमार्गाने चालता चालता पालटून जाते.

भाजपाचे हेच झाले आहे. समाजकल्याण हे भाजपाचे ध्येय होते का याचा संशय यावा इतके या ध्येयाचे रूप बदलून गेले आहे. वेगळा चेहरा घेऊन लोकांपुढे आलेल्या या पक्षाचेही रूप सत्तेकडे जाताना इतर पक्षांइतके अनैतिकतेने बरबटले आहे. याचे दृश्य परिणाम काही काळाने दिसतील. समाजकारणाचे ध्येय आहे सांगणाऱ्या या पक्षाने सत्तेपर्यंत येताना

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

वाटेतील प्रत्येकाला फसविले. त्यामुळे सत्ता आल्यावर समाजकारण करणे तर सोडाच, या पक्षाला सत्ता टिकवणे अवघड जाणार आहे.

भाजपाने सत्तेसाठी मराठ्यांना आरक्षणाचे आश्वासन दिले. त्यासाठी समिती नेमल्याचे नाटक केले. न्यायालयात बाजू व्यवस्थित मांडता येईना, तेव्हा बडा वकील आणण्याच्या घोषणा केल्या. हा बडा वकील लंडनहून आलाच नाही. शेवटी जिवावर बेतू लागले तेव्हा मागास प्रवर्ग आयोग निर्माण केला आणि आयोगाकडे हा मुद्दा सोपवा असे कोर्टात सांगून टाकले. म्हणजे न्यायालयीन लढ्याला एक पिढी संपेपर्यंतची खीळ बसली. दुसरीकडे मराठा आरक्षणासाठी भव्य मोर्चे काढत लढा सुरू होता, त्यात शिताफीने अशी फूट पाडून ठेवली की, आता मुंबईचा एकत्रित मोर्चा होईल असे वाटत नाही. मराठ्यांना अशा तऱ्हेने अगदी पद्धतशीरपणे फसविण्यात आले.

धनगर आरक्षणाचे तेच झाले. सत्तेवर आल्यानंतर पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत धनगर आरक्षण देऊ असे भाजपाने प्रचारात ठासून सांगितले होते. मात्र मंत्रिमंडळाच्या अनेक बैठका झाल्यावरही काही झाले नाही. धनगर आरक्षणाचा अहवाल बनविण्याची जबाबदारी टाटा विज्ञान संस्थेकडे दिली इतकेच नेते सांगतात. मात्र हे सांगत नाहीत की, त्यासाठी समिती नेमली आहे. या समितीत आरक्षणाच्या विरोधात जो बोलेल त्या सदस्याला बाहेर काढून नवीन सदस्य नेमणे

हा एकच कार्यक्रम हे सरकार गेली अडीच वर्षे करीत आहे. २०१९ पर्यंत हेच सुरू राहील. पुढील प्रचारात भाजपावाले सांगतील की, अहवाल पूर्ण होताच आरक्षण देऊ. यापलीकडे धनगर आरक्षणाबाबत काही होणार नाही.

दलितांची तर रोज फसवणूक सुरू असते. दलितांची मते खिशात टाकण्यासाठी आटापिटा सुरू आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती एकदा समता दिवस म्हणून साजरी करतात, नंतर तो 'ज्ञान दिवस' म्हणून घोषणा होते. इंदू मिलवर १२ एकरात स्मारक होणार म्हणून सांगतात आणि अद्याप संपूर्ण १२ एकर जमीन ताब्यात दिलेली नाही. इंदू मिलची जमीन केंद्राच्या ताब्यात आलेली नसताना पंतप्रधान मोदींनी मुंबईत येऊन इंदू मिलमध्ये स्मारकाचे भूमिपूजन केले. २०१४ च्या निवडणुकीसाठी दलितांची ही फसवणूक केली. २०१९ ला भाजपा स्मारकाचा आराखडा राज्यभर फिरवेल आणि दलितांसाठी आपण खूप करतो हे भासवण्याचा प्रयत्न होईल. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल इतकी आस्था होती तर केंद्र सरकारने नव्याने छापलेल्या दोन हजार आणि पाचशेच्या नोटांवर त्यांचे छायाचित्र का आणले नाही? त्यामुळे हे दलित प्रेम मतांपुरते आहे हे स्पष्ट जाणवते.

दलित, मराठा, धनगरांची फसवणूक केल्यावर आता मुस्लीम आणि ओबीसींकडे यांनी मोर्चा वळविला आहे. २०१९ च्या निवडणुकीसाठी मुस्लीम व ओबीसींना जवळ करा, असा राष्ट्रीय कार्यकारिणीत ठरावच झाला आहे. ओबीसी आयोग अस्तित्वात होताच. भाजपाने त्याला कायदेशीर मान्यता दिली हे मोठे काम केले याचा ढोल प्रत्येक राज्यात बडवा, असा आदेश पंतप्रधान मोदींनी दिला आहे. येत्या काळात अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने ही प्रचारयंत्रणा राबवली जाईल. ओबीसींसाठी असंख्य सरकारी योजना आहेत, त्या त्यांच्यापर्यंत पोचवणे महत्त्वाचे आहे. पण अस्तित्वात असलेल्या योजना पोचविण्याचे काम करणे हे कष्टाचे आहे, दुसरी बाब म्हणजे त्यात भाजपाने ओबीसींसाठी फार काही केले हे कसे भासवता येईल? त्यामुळे आयोगाला कायदेशीर मान्यता दिली याचा गवगवा करायचा आणि २०१९ च्या निवडणुकीत ओबीसींना भुलवायचे हा सोपा रस्ता आहे. हाच सोपा रस्ता भाजपाने निवडला आहे.

भाजपाच्या भूलथापांबाबत लिहिले की, भाजपाची सोशल मीडियाची यंत्रणा अंगावर येते, पण सत्य अमान्य कसे करता येईल? वास्तव नाकारता कसे येईल? भाजपावर टीका करणारा काँग्रेसवाला किंवा राष्ट्रवादीवाला आहे असे आरोप सतत कसे करता येतील? आज जे धडधडीतपणे दिसते आहे ते हेच की, भाजपाने मराठ्यांना फसविले, दलितांना फसविले, धनगरांना फसविले, आता मुस्लीम व ओबीसींना फसवतील. भाजपाने फक्त महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना फसविले नाही. भाजपाने शेतकऱ्यांना सत्य सांगितले आहे- आम्ही शेततळी बांधतो, त्याचे परिणाम काही वर्षांनी दिसतील, तोपर्यंत तुम्हाला तग धरता येत नसेल तर शेततळ्यातच उडी घेऊन आत्महत्या करा. चुकीच्या मार्गाने जाऊन सत्ता मिळवली की, सत्तेचा चेहरा असा विद्रूप होतो.